**महाराष्ट्र शासन**
**परिवहन आयुक्त कार्यालय**
**५ वा मजला, टेलिकॉम बिल्डिंग नं २,**
**महात्मा गांधी रोड, फाउंटन, मुंबई - ४०० ०३२.**

दूरध्वनी क्र. ०२२-२०८२६४९८ ई-मेल : dytccomp.tpt-mh@gov.in

क्र.पआका/का-११/वाहन/२०२६/जा.क्र 1881 **दिनांक :** 13 FEB 2026

**प्रति,**

**मा. महासंचालक,**

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,**

**मंत्रालय, मुंबई.**

**विषय :** परिवहन विभागाचे बनावट वेबसाइट्स, मोबाईल ॲप्स (APK) व खोट्या e-Challan लिंकपासून नागरिकांनी सतर्क राहण्याबाबतचे प्रसिद्धीपत्रक जारी करण्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून सादर करण्यात येते की, राज्यातील वाहन चालक व नागरिक यांना बनावट परिवहन वेबसाइट्स, मोबाईल ॲप्स (APK) तसेच खोट्या e-Challan लिंकपासून सतर्क करण्याच्या उद्देशाने प्रसिद्धीपत्रक जारी केले आहे. सदर प्रसिद्धीपत्रकास राज्यातील सर्व वृत्तपत्रात प्रसिद्धी देण्यात यावी, ही नम्र विनंती.

**सोबत : प्रसिद्धीपत्रक**

**( शैलेश कामत )**
**सह परिवहन आयुक्त (संगणक),**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**प्रत:** सर्व प्रादेशिक / उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात सदर प्रसिद्धीपत्रकास व्यापक प्रसिद्धी द्यावी.

महाराष्ट्र शासन
परिवहन आयुक्त कार्यालय
५ वा मजला, टेलिकॉम बिल्डिंग नं २,
महात्मा गांधी रॉड, फाउंटन, मुंबई - ४०० ०३२.
ई-मेल : dytccomp.tpt-mh@gov.in
दूरध्वनी क्र. ०२२-२०८२६४९८

# प्रसिद्धीपत्रक

विषय : **परिवहन विभागाच्या बनावट वेबसाइट्स, मोबाईल ॲप्स (APK) व खोट्या e-Challan लिंकपासून नागरिकांनी सतर्क राहण्याबाबत.**

परिवहन विभागाच्या निदर्शनास आले आहे की, अलीकडील काळात ड्रायव्हिंग लायसन्स, वाहन नोंदणी, ई-चलन इत्यादी सेवांशी संबंधित **बनावट वेबसाइट्स, फसवे मोबाईल ॲप्स (APKs), तसेच मोबाइल SMS/WhatsApp द्वारे पाठविल्या जाणाऱ्या खोट्या लिंक** मोठ्या प्रमाणात नागरिकांना फसवित आहेत. यामुळे सर्व वाहन चालक / मालक यांची आर्थिक फसवणूक, वैयक्तिक माहितीची चोरी तसेच नागरिकांच्या ओळखीचा गैरवापर होत असल्याचे आढळून आले आहे.

सबब सर्व वाहन चालक/मालक यांनी परिवहन विभागाच्या खालील अधिकृत शासकीय संकेतस्थळांचा वापर करावा :

१) वाहन नोंदणी सेवा (VAHAN) – https://vahan.parivahan.gov.in
२) ड्रायव्हिंग लायसन्स सेवा (SARATHI) – https://sarathi.parivahan.gov.in
३) परिवहन सेवा – https://www.parivahan.gov.in
४) ई-चलन पोर्टल – https://echallan.parivahan.gov.in

वरील सर्व अधिकृत संकेतस्थळे **".gov.in"** ने समाप्त होतात. **".com"**, **".online"**, **".site"**, **".in"** अशा डोमेनवरील कोणत्याही वेबसाइटवर नागरिकांनी उघडू नये.

फसवणूक करणाऱ्यांकडून पाठविले जाणारे संदेश बहुधा खालीलप्रमाणे असतात :

- आपल्या वाहनाचे चलन बाकी असून त्वरित दंड भरण्याची धमकी देण्यात येते व अनधिकृत लिंक पाठविण्यात येऊन त्वरित दंड भरण्याचे संदेश प्राप्त होतात.
- "DL(वाहन चालविण्याचा परवाना) सस्पेंड होणार आहे. त्वरित तपासणी करा."

RTO कार्यालय किंवा परिवहन विभागाकडून नागरिकांच्या मोबाईलमध्ये **कधीही WhatsApp द्वारे व इतर मोबाईल App द्वारे पेमेंट लिंक पाठविली जात नाही**, याची नोंद घ्यावी.

तसेच, “RTO Services.apk”, “mParivahan_Update.apk”, “eChallan_Pay.apk” अशा **अनधिकृत APK ॲप्स / लिंक डाउनलोड करू नयेत**, कारण त्याद्वारे OTP, बँकिंग माहिती व मोबाईलमधील इतर संवेदनशील माहिती चोरीला जाण्याची शक्यता असते.

नागरिकांनी कोणताही संशयास्पद संदेश/लिंक प्राप्त झाल्यास तात्काळ खालील ठिकाणी तक्रार नोंदवावी :

**National Cyber Crime Portal** – https://www.cybercrime.gov.in
**सायबर फसवणूक हेल्पलाइन** – १९३०
**जवळचे जिल्हा सायबर पोलीस स्टेशन**

**तरी, सर्व वाहन चालक / मालक व सर्व नागरिकांनी सायबर फसवणुकीपासून सावध राहून योग्य ती दक्षता घ्यावी. तसेच या बाबत योग्य माहिती मिळविण्यासाठी संबंधित प्रादेशिक परिवहन कार्यालय किंवा वाहतूक विभागाशी संपर्क साधावा.**

( शैलेश कामत )
सह परिवहन आयुक्त (संगणक),
महाराष्ट्र राज्य, मुंबई.